**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक : 09/02/2018.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>फेब्रुवारी महिन्याची सर्वसाधारण सभा, शनिवार, दिनांक 17 फेब्रुवारी 2018 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1.** इतिवृत्त.

**2.** प्रश्नोत्तरे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव :</u>**

***3.** ऐरोली से-15 येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या जवळील म.रा.वि.वि. कंपनी उपकेंद्र प्लॉट नं.12, से-14 येथे स्थलांतरीत करणे.

**4.** कोपरखैरणे सेक्टर 14 भूखंड क्र. 22 येथे नागरी आरोग्य केंद्र बांधणे.

**5.** महापालिका मालकीच्या मालमत्तांवर युनिपोल होर्डीग, गॅन्ट्री, पादचारी पुल(एफओबी), ब्रीज पॅनलवरील जाहिराती, फ्री स्टॅडींग युनिट उभारणे, त्यापासून महापालिकेस उत्पन्न देणे, परिसराचे सुशोभिकरण करणे, निगा व देखभाल दुरुस्ती करणे यासाठी 07 वर्षे कालावधीसाठी खाजगी सार्वजनिक सहभाग (Public Private Partnership) या तत्वावर जाहिरातीचे हक्क देऊन विकसित करणे.

**6.** वाशी सेक्टर 16ए येथील अग्निशमन केंद्र ते सेक्टर 15 येथील विभाग कार्यालय पर्यंत मुख्य रस्त्यालगत असलेल्या स्टॉम वॉटर ड्रेन व फुटपाथचे बांधकाम करणे.

**7.** घणसोली सेक्टर-6 येथील भुखंड क्रमांक 17 येथे महिला सक्षमीकरण केंद्र बांधणे.

**8.** तुर्भे से.23 जनता मार्केट येथील रस्त्यांची सुधारणा व S.W.Drain बांधणे.

**9.** नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी नवीन वाहने खरेदी करणे.

**10.** महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमानुसार विभागीय चौकशीअंती डॉ. दिपक रामचंद्र परोपकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-56(2)(क) मधील "समयश्रेणीतील खालच्या सहा टप्प्यांवर आणणे" ही प्रस्तावित शास्ती कायम करणे.

**11.** नमुंमपा कार्यक्षेत्रात टायफॉईट कंज्युगेट व्हॅक्सीन (Typhoid Conjugate Vaccine) प्रकल्प राबविणे.

**<u>ठरावाच्या सूचना :</u>**

**12 ते 14. श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**

**(12)** "प्रभाग क्र. 12 सेक्टर 02 येथील प्रिती सोसायटी रो हाऊस नं- 10 ते प्लॉट नं. 70 पर्यंत, तसेच सी 432 ते सी 565 पर्यंत व आरंभ सोसायटी रो. हाऊस नं. 01 ते रो हाऊस नं. 12 पर्यंत मेनलाईन, प्रितम सोसायटी रो. हाऊस नं-33 ते अभिनव रहाटे यांच्या घरापर्यंत व मिलिंद सोसायटी रो, हाऊस नं.1 ते रो हाऊस नं. 13 पर्यंत मेनलाईन, विशाल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं 18 ते साई सदन सोसायटी रो हाऊस नं-1 पर्यंत व ई 369 ते ई 456 अजिंक्य हॉस्पिटल दरम्यान तसेच श्री सिध्दि गणेश रो. हाऊस नं. 1 ते ई - 356 पर्यंत, ई 356 ते प्लॉट नं. 32 पर्यंत, सी 347 ते प्रिती रो. हाऊस नं. 9 पर्यंत च्या सर्व सिडको कालिन मेन मलनि:स्सारण वाहिन्या त्वरीत बदलून देणे. **(13)** "प्रभाग क्र. 12 सेक्टर 02 येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयानातील मुख्य गेट वर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच माता रमाई चे भिंती रहीत तैल चित्र ज्या प्रमाणे ठाणे महानगरपालिका अंतर्गत दादोजी कोंडदेव स्टेडियम समोरील भिंती रहीत तैल चित्राच्या धरतीवर प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 येथे करुन देणे. **(14)** "प्रभाग क्र. 12 सेक्टर 02 येथील जलवाहिन्या नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सन-2001 साली बदलण्यात आल्या होत्या. परंतु सदय स्थितित त्या जलवाहिन्या जीर्ण झालेल्या असून त्या गंजलेल्या अवस्थेत आहेत. तरी प्रभाग क्र. 12, सेक्टर-2 येथील कंडोनिअम अंतर्गत दोन इंचाच्या नविन जल वाहिन्या टाकून देणे.

**15 ते 17. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**

**(15)** "नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांच्या वैयक्तिक गृहनिर्माण कर्जाची मर्यादा वाढवून वेतनबँड क्रमांक-1 एस ते पी.बी. 1 यांच्याकरिता रू. 25 लाख, व वेतनबँड क्रमांक- पी.बी.-2 यांच्याकरिता रू. 30 लाख आणि वेतनबँड क्रमांक- पी.बी.-3 यांच्याकरिता रू.35 लाख करुन व्याजदरात 1% ते 2% ने कपात करणे. **(16)** "महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी यांची रोस्टरप्रमाणे व शासन निर्णय क्रमांक:- 1215/394/प्र.क्र.16/15/नवि-28, दिनांक 21 ऑगस्ट, 2017 च्या आकृतीबंधानुसार भरती व पदोन्नती आणि पदस्थापना तातडीने करणे. **(17)** "प्रभाग क्र. 111, नेरूळ नोड-15 मधील सेक्टर 58अे मध्ये कॉंक्रीटचे नवीन फुटपाथ तयार करणे.

**18. श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**

"भारत सरकारने "पद्मश्री" या पदविने सन्मानित केलेले राज्य सरकारचे "स्वच्छता दूत" असलेले अनेक महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, तसेच अनेक स्वयंसेवी संस्था यांनी सन्मानित केलेले रायगडचे सुपत्र "जेष्ठ निरुपणकार तीर्थरुप डॉ. श्री. दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी तथा असंख्य अनुयायांचे अप्पासाहेब धर्माधिकारी" यांनी "समर्थ बैठक" या बैठकिच्या माध्यमातून आध्यात्म आणि परमार्थाच्या शिकवणीतून एक आदर्श समाज घडविण्यासाठी तळागाळातील शेवटच्या माणसांपर्यंत समाज प्रबोधन करून स्वातंत्र्य, समता, बंधुभाव प्रत्येक माणसाच्या मनात रुजविला आहे. तसेच देशहित, राष्ट्रप्रेम जपण्याकरिता आपल्या असंख्य अनुयायाच्या योगदानातून "महाराष्ट्र भूषण" स्वर्गीय तीर्थरुप "डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान" या प्रतिष्ठानच्या वतीने स्वच्छता अभियान, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीरे, वृक्षरोपन व संवर्धन, जलपुर्नभरण, शैक्षणिक मार्गदर्शने, बालसंस्कार मार्गदर्शने, पाण पोईंची निर्मीती हे समाजहिताचे कार्य समाजातील तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचविण्याचे बहुमुल्य योगदान कृतीतून केले आहे. तसेच नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान या सारखे सामाजिक उपक्रम आपल्या अनुयायांकडून राबविले आहेत. महाराष्ट्र भूषण स्वर्गीय तीर्थरुप डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांनी निकोप समाज घडविण्यासाठी "श्री समर्थ बैठक" सोमवार दि. 10 ऑक्टोबर 1943 रोजी विजया दशमी मुंबई गोरेगाव येथे "पहिली बैठक" आयोजित केली या बैठकीचे "अमृत महोत्सवी वर्ष" (75 वर्षे) सुरु आहे या शुभवर्षाचे औचित्य साधून "तीर्थरुप डॉ. श्री अप्पासाहेब धर्माधिकारी" यांचा नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने "नागरी सन्मान" करुन त्यांचा गौरव करण्यात यावा व "नागरी सन्मान" सत्कार सोहळयास नवी मुंबईतील जनतेला व त्यांच्या असंख्य अनुयायांना सहभागी होता यावे अशा प्रकारे या सोहळयाचे आयोजन करणे.

**19 ते 21. श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**

**(19)** "प्रभाग क्र. 48, पावणेगाव मधील संत भगवान बाग बगीचा येथे योगा केंद्र सांस्कृतिक कार्यक्रम साठी स्टेज बनविणे. **(20)** "प्रभाग क्र. 48, येथील श्रमिकनगर CETP च्या समोरील रस्त्यानजीक (A ब्लॉक रस्ता नजिक) शौचालय बांधणे. **(21)** "प्रभाग क्र. 48, येथील पावणे स्मशानभुमी मध्ये पिण्याच्या पाणीसाठी तसेच लाकुड व्यवस्था करणे.

**22 ते 24. श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-**

**(22)** "सी.बी.डी. से. 9 मधिल पिपल्स हायस्कुलच्या मागील बाजुच्या मैदानाची दुरुस्ती व सुशोभिकरण करणे. **(23)** "सी.बी.डी. से. 9 मधिल डॉ. बळीराम हेगडेवार (मँगो गार्डन) मधे असलेल्या पाँडमध्ये कारंजे बसवून पाँडचे सुशोभिकरण करणे. **(24)** "सी.बी.डी. से. 9 मधिल सदगुरु सोसायटी ते एकता उदयानापर्यंतच्या गटाराची दुरुस्ती करणे.

**25 व 26. श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**

**(25)** "सुप्रिम कोर्टचे सिव्हील अपील क्रं. 6454/2011 या याचिकेवर न्यायाधिशांनी दिलेल्या निर्णयास अनुसरुन असे सुचवू इच्छितो की, नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयात वारंवार माहिती अधिकारात माहिती अधिकार कार्यकर्ते विविध विषयांची / महापालिकेशी संबंधित कामकाजाची माहिती मागवत असतात. त्यांच्यामुळे महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांना तसेच नागरी विकास कामांना खोडा घातला जात आहे. अशा माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या उपद्रवांमुळे महापालिकेच्या विकास कामात अडथळा येत आहे, शासकीय कार्यालयास वेठीस धरले जात आहे. अशा घातक प्रवृत्तीच्या व्यक्तींमुळे माहिती अधिकार कायदयाच्या मूळ उददेशाला धोका पोहचत आहे तसेच माहिती अधिकार कायदयाच्या अशा गैरवापरामुळे शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मनात एका चांगल्या व पारदर्शक कायदयाबदद्ल नकारात्मक भावना उत्पन्न होत आहे. तरी माहिती अधिकार कायदया बदद्ल सकारात्मक भावना रुजण्यासाठी व त्याचा दुरुपयोग करणा-या घटकांना वेळीच आळा घालणे आवश्यक व काळाची गरज आहे. तरी सुप्रिम कोर्टचे सिव्हील अपील क्रं. 6454/2011 च्या निर्णयानुसार जे माहिती अधिकार कार्यकर्ते माहिती अधिकारात माहिती मागवून महापालिकेला/शासकीय यंत्रणेला वेठीस धरत असतील व नागरी विकासकामांमध्ये अडथळा निर्माण करत असतील अशा माहिती अधिकार व अर्जदारांना महापालिकेने काळया यादीत टाकून त्यांच्या अपीलांची सुनावणी घेवू नये. **(26)** "मी प्रतिनिधित्व करत असलेल्या प्रभाग क्र. 61 सेक्टर 9, वाशी, नवी मुंबई येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयानाच्या प्रवेशद्वारावर बौध्दस्तुप कमान उभारण्यात यावी अशी येथील आंबेडकर अनुयायी जनतेची मागणी आहे. त्यानुसार आपण सदर ठिकाणी बौध्दस्तुप कमान उभारणे.

**27 ते 29. श्री. नवीन मोरेश्वर गवते, यांजकडून :-**

**(27)** "प्रभाग क्र. 04 दिघा, साठे नगर येथील OS -1 भूखंडावर इयत्ता 1 ली ते इयत्ता 10 वी पर्यंत प्राथमिक व माध्यमिक शाळा, नागरी आरोग्य केंद्र (UHP) व उच्च क्षमतेचे पाणी साठवणूक क्षमतेचे उच्चस्तरीय व भूमिगत जलकुंभ बांधणे. **(28)** "साठे नगर, विष्णूनगर, विजयनगर, रामजी आंबेडकर नगर, पंढरीनगर व दिघा (पूर्व) या भागात मलनिसा:रण वाहीन्या टाकणे. **(29)** "पंढरीनगर येथे गट नं. 147 मौजे दिघा येथे आमचे कुटुंबियांचे मालकी हक्काचे जागेवर G+2 बहुउददेशिय इमारत बांधणे.

**30 ते 32. श्रीम. दिपा राजेश गवते, यांजकडून :-**

**(30)** "गणपतीपाडा पेट्रोलपंप शेजारी RCC नाला बांधून त्यास लोखंडी Ralling बसविणे. **(31)** "गणपतीपाडा, आंबेडकर नगर गणेश नगर, दुर्गानगर, सावित्री नगर, महात्मा फुले नगर व बिंदुमाधव नगर येथे मलनिसा:रण वाहीन्या टाकणे. **(32)** "बिंदू माधव नगर येथे HOLDING POND बांधणे.

**33 ते 35. ॲड श्रीम.अपर्णा नवीन गवते, यांजकडून :-**
**(33)** "प्रभाग क्र. 9 येथील संजय गांधी नगर नामदेव नगर, दिघा या विभागात मलनिसा:रण वाहीन्या टाकणे. **(34)** "संजय गांधी नगर हा दिघ्याचाच एक भाग असून त्याची सर्व प्रशासकीय कामे "जी" विभाग कार्यालय ऐरोली येथूनच होतात त्यामुळे नागरीकांचा वेळ व पैसा वाया जात आहे तरी संजय गांधीनगर हा विभाग प्रशासकीय कामासाठी व नागरीकांच्या सुलभतेसाठी "एच" विभाग कार्यालय दिघा येथे वर्ग करणे.**(35)** "प्रभाग क्र.9 दिघा गावातील असलेल्या बहुउद्देशिय इमारतीत वाचनालयासाठी जागा अपुरी पडत असून सदर इमारतीवर 1 वाढीव मजल्याचे बांधकाम करणे.

**36 ते 38. श्रीम.सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-**
**(36)** "प्रभाग क्र. 31, मधील समर्थ नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. **(37)** "प्रभाग क्र. 31 मधील राम मंदिर ते गुणाली तलाव या रस्त्याचे डांबरीकरण करणे. **(38)** "प्रभाग क्र. 31, मध्ये समर्थ नगर मधील विश्वनाथ म्हात्रे यांच्या घराजवळील गटर दुरुस्ती करणे.

**39 ते 41. श्रीम. संगिता संदिप म्हात्रे, यांजकडून :-**
**(39)** "प्रभाग क्र. 45, मधील से. 03 येथील जुने विद्युत दिवे बदलून नविन एल.ई.डी. दिवे बसविणे. **(40)** "प्रभाग क्र. 45, मधील मधील कोपरखैरणे विभाग कार्यालयाच्या मागील बाजूस निवारा शेड बनविणे. **(41)** "प्रभाग क्र. 45, मधील से. 03, 6 व 7 च्या मुख्य रस्त्यावरील पदपथांची दुरुस्ती करणे.

**42 ते 44. श्री. विलास रामदास भोईर, यांजकडून :-**
**(42)** "प्रभाग क्र. 57 मधील आरेंजा सर्कल ते पोलीस वाहतूक चौकी(एपीएमसी) पर्यंतच्या नाल्याची पुर्नबांधणी करणे. **(43)** "प्रभाग क्र. 57 तुर्भे गावात प्रवेश रस्त्यावर पनवेल मुंबई हायवेच्या बाजूला पेट्रोल पंप व हॉटेल आपेंटाइट मधील रस्त्यास सिमेंट कॉंक्रीट ची कमान बांधणे. **(44)** "प्रभाग क्र. 57 मधील भूखंड क्र. 3-1 सेक्टर 18 (मॅफको) तुर्भे नवी मुंबई हा भूखंड जनहितास्तव आरक्षित ठेवण्यात यावा. तसेच सदर भूखंड सार्वजनिक मैदानासाठी सिडको कडून त्वरित हस्तांतरित करुन घेण्याची कार्यवाही करणे.

**45 ते 47. श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**
**(45)** "प्रभाग क्र. 51 मधील कै. शंकरशेठ नाईक इमारत/मैदानाच्या मुख्य प्रवेशव्दार व संरक्षक भिंतीची लवकरात लवकर दुरुस्ती करणे. **(46)** "प्रभाग क्र. 51 मधील कै. दिनानाथ म्हात्रे उदयानातील खेळणी व ओपन जिमची दुरावस्था झालेली आहे ती सुधारणे. **(47)** "प्रभाग क्र. 51 मधील फाम सोसायटी समोर व बोनकोडे स्मशानामागील जागा नागरिकांच्या सोईसाठी मार्केटकरिता होती तरी सदर ठिकाणी डी.पी. चा सर्व्हे होणार आहे त्यामध्ये सदर बिना रहदारीचा मार्ग फेरीवाला क्षेत्र म्हणून राखीव करणे.

**48 ते 50. श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**
**(48)** "प्रभाग क्र. 55 , खैरणेगाव फूटब्रिज ते निशांत विडीओ सेंटर पर्यंत दोन्ही बाजूस हेवी डयुटी गटार बांधणे. **(49)** "प्रभाग क्र. 55 , खैरणे गांव येथील साई दर्शन बिल्डिंग ते निशांत विडीओ सेंटर पर्यंत हेवी डयुटी गटार बांधणे. **(50)** "प्रभाग क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे येथील जॉगिंग ट्रॅकचे सुशोभिकरण करणे.

**51 व 52. श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-**
**(51)** "प्रभाग क्र. 43, कोपरखैरणे मधील सेक्टर 17 व 18 मधील वसाहती अंतर्गत मलनि:स्सारण वाहिन्या बदलणे. **(52)** "प्रभाग क्र. 43, कोपरखैरणे मधील सेक्टर 17 व 18 मधील वसाहती अंतर्गत जलवाहिन्या बदलणे.

**53 ते 55. श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**
**(53)** "प्रभाग क्र. 26 महापे मधील अडवली भुतावली गावातील नमुंमपा शाळा क्र. 41 या शाळेत अडवली भुतावली गावातील MIDC भागातील, तसेच झोपडपटटी व क्वॉरी भागातील गरिब व गरजू विदयार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळेत 8 वी पर्यंत वर्ग असून येथील एकूण विदयार्थी संख्या बालवाडी ते 8 वी पर्यंत 485 इतकी आहे. सदर ठिकाणी 8 वी पर्यंत वर्ग असून पुढील शिक्षणासाठी विदयार्थ्यांना महापे, कोपरखैरणे घणसोली येथे जावे लागते. येथून जाणारे विदयार्थी गरिब असून त्यांना महापे गावातील शाळेत पायी जावे लागत असून त्यांना अनेक रस्ते ओलांडून जावे लागते, रस्ते ओलाडतांना अनेक विदयार्थ्यांचे अपघात सुध्दा झाले आहेत. या शाळेत तिसरी वर्गात 74 विदयार्थी एकाच वर्गात शिक्षण घेत आहेत. सदर ठिकाणी दोन वर्गातील विदयार्थी एकाच वर्गात बसत असून येथे वर्ग वाढवण्याचे गरजेचे आहे.

| पटसंख्या | | | |
|---|---|---|---|
| इयत्ता | मुले | मुली | एकुण |
| बालवाडी | 19 | 29 | 48 |
| खेळवाडी | 11 | 14 | 25 |
| 1 ली | 37 | 29 | 66 |
| 2 री | 29 | 22 | 51 |
| 3 री | 33 | 41 | 74 |
| 4 थी | 32 | 21 | 53 |
| 5 वी | 23 | 33 | 56 |
| 6 वी | 26 | 21 | 47 |
| 7 वी | 10 | 20 | 30 |
| 8 वी | 13 | 22 | 35 |
| एकुण | 233 | 252 | 485 |

तरी येथील शाळेत दहावी पर्यंत वर्ग करण्यात यावे व येथील वर्ग वाढविणे. **(54)**"प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भुतावली गावात सन 1982-83 साली आदिवासी लोकांसाठी इंदिरा आवास योजने अंतर्गत 84 घरे बांधण्यात आली होती. सदय स्थितीत त्यांची मोठया प्रमाणात दुरावस्था झाली असून ही घरे मोडकळीस आली आहेत या आदिवासीची आर्थिक स्थिती गरीब असल्याने त्यांना या घरामध्ये, राहण्याशिवाय पर्याय नाही आहे. तरी या 84 आदिवासीची घरांची पुर्नबांधणी करणे. **(55)** "प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भुतावली गावात गरीब व गरजू मागासवर्गीय आदिवासींची लोकवस्ती आहे. येथे नागरी आरोग्य केंद्र नसल्याने येथील नागरी गरीब व गरजू लोकांची खूप गैरसोय होत आहे. येथील नागरिकांना उपचारासाठी महापे येथे जावे लागते. तसेच पल्स पोलिओ, लसीकरणसाठी येणा-या कर्मचा-यांना अंगणवाडीमध्ये बसून काम करावे लागते. जर येथे नागरी आरोग्य केंद्र असेल तर त्यांच्या सोयीचे होईल. तसेच अडवली-भूतावली गावाच्य आजूबाजूला MIDC, झोपडपटटी व क्वॉरी भाग असून येथील गरीब व गरजू लोकांना देखील सुविधा मिळू शकेल. तरी येथे लवकरात लवकर नागरी आरोग्य केंद्र उभारणे.

**56 व 57. श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**
**(56)** "नमुमपा च्या संपुर्ण कारभारातुन छपाईसाठी A5 (फुलस्केप) साईजच्या वापरल्या जाणा-या सर्व कागदांचा वापर बंद करुन त्या ऐवजी A4 (लेटर) साईजच्या कागदांचा वापर केल्यामुळे विनाकारण वाया जाणारे कागद थांबवावे त्याच प्रमाणे राज्य सरकारने अंगिकारल्या प्रमाणे कागदाचा पाठपोठ वापर करुन कागदाचा कमीत कमी वापर करावा तसेच घरोघरी व कार्यालयात असलेल्या व परवडणाऱ्या 80 कॉलम प्रिंटरमधुन गरजेच्यावेळी झेरॉक्स सोय होऊन झेरॉक्ससाठी लागणारा वेळ व खर्च वाचवण्याच्यासाठी व नगरसेवकांना महासभेचे वृतांत व प्रश्नोत्तरांच्या भरमसाठ कागदांचे वागवावे लागणारे अर्धे ओझे कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे हित जपण्यासाठी A5 कागदांचा वापर ताबोडतोब थांबविणे. **(57)** "नमुमपा च्या पत्रव्यवहारात लिलिल्या जाणा-या जावक क्रमांकांची रचना बदलुन जावक क्रमांक लिहिण्यासाठी जी मध्ये जागा सोडतात ती शेवटी सोडण्यात यावी जेणे करुन कमी जागा सोडलेली असताना लिपिकांना जावक क्रमांक मध्ये लिहीताना अडचण होते ती होणार नाही व वाचणारालाही शेवटी लिहीला जाणारा जावक क्रमांक नीट वाचता येईल त्यासाठी पालिकेच्या पत्रात हाताने लिहिली जाणारा जावक क्रमांक शेवटी लिहिला जावा, (उदा : नमुंमपा/कनिस/बिविने/1916/2017 हा जावक क्र. नमुंमपा/कनिस/बिविने/ 2017/1196),

**58 ते 60. श्रीम. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-**
**(58)** "प्रभाग क्र. 37, अंतर्गत येणारा कोपरखैरणे - महापे ब्रिज ची डागडुजी करुन रंगरंगोटी करणे. **(59)** "प्रभाग क्र. 37, सेक्टर 1A मध्ये येणा-या सर्व पादचारी ब्रिज ची नव्याने दुरुस्ती करणे. **(60)** "तेरणा कॉलेजच्या लगत फुटपाथ दुरुस्ती करणे व स्टॅप कॉंक्रीटीकरण (प्लॉट 21 च्या बाजूला) करणे.

**61 ते 63. श्रीम. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-**
**(61)** "प्रभाग क्र. 101, सेक्टर 23 भुखंड क्रमांक 10 शाळेकरीता राखीव असलेल्या भुखंडावर शाळेची इमारत बांधणे.

**(62)** "प्रभाग क्र. 101, मधील कोकण भवन येथील पार्कींग शेजारी असलेल्या भूखंड क्र. 15 सेक्टर 10 येथील लायब्ररीसाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर लायब्ररी बनविणे. **(63)** "प्रभाग क्र. 101, मधील आग्रोळी गाव येथील नमुंमपा शाळा क्र. 3 येथे 1 मजला वाढीव बांधकाम करणे.

**64. श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-**
"शिरवणे गाव येथील पाणी पुरवठा सुरळीत करणेकरीता उच्चस्तरीय जलकुंभ बांधणे.

**65 ते 67. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**
**(65)** "प्रभाग क्रं. 01 ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागात पावसाळी गटार बांधणे. **(66)** "प्रभाग क्रं. 01 ईश्वरनगर येथील संपूर्ण प्रभागात अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. **(67)** "प्रभाग क्रं. 01 ईश्वरनगर येथील सिध्दीविनायक मंदिर ते मन्नुभाई चाळ मैदान पर्यंत रस्ता बांधुन तेथे हेवी डयुटी गटार बांधणे.

**68 ते 70. श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**
**(68)** "सानपाडा सेक्टर 08 येथील बाबू गेनू मैदान लगतचे शौचालय अपुरे असल्याने येथील लगतच्या पोलिस स्टेशनमधील कर्मचारी पोलिस यांची संख्या 40 च्या वर आहे तसेच रस्त्यावरील येणारे जाणारे नागरीकांची वर्दळ ही जास्त प्रमाणात आहे व मैदानात अखंड हरीनाम सप्ताहसारखे कार्यक्रम होत असतात त्यासाठी मैदानात 4000/5000 भक्त जमत असतात. त्यामुळे सदरचे शौचालय पुरेशे नाही व Unhygenic आहे. त्या दृष्टीने मोठे व अदयावत (1+1) बनविणे. **(69)** "सानपाडा, सेक्टर 09, भूखंड क्रमांक 03 येथे 14000 चौ. स्के. मी. चे मैदान असून येथिल 14 वयोगटाखालील मुले MCA मध्ये खेळतात. तसा येथे क्रिडा प्रशिक्षण केद्र बांधण्यात यावे असा ठराव केलेला आहे. परंतु या क्रिडा प्रशिक्षण बांधकाम केंद्रात जल-तरण तलावाचाही समावेश असावा तसेच या मैदानात विविध खेळासाठी तरतूद करणे. **(70)** "सानपाडा, सेक्टर 11, भूखंड क्रमांक 01 येथे आधुनिक वाचनालय बनविण्यात यावे यासाठी लवकरात लवकर वास्तुविशारद यांची नेमणूक करुन कामाला गती देणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**
**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 09 फेब्रुवारी 2018.**